सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता विद्यार्थी हरित सेना (२४०६ A१९४) लेखाशीर्षांतर्गत उर्वरित अनुदान वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः साववि-२०१७/प्र.क्र.१०६/फ-११

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २० मार्च, २०१८

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क. ७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.

२) वित्त विभाग,शासन परिपत्रक, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र. ६८/अर्थ-३, दि. १.०४.२०१७.

३) वित्त विभाग,शासन परिपत्रक, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७

४) विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क. ७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८.

५) महसूल व वन विभाग,ज्ञापन क्रमांक बीयुडी-२०१८/२४०६/ प्र.क्र.३१/ब-१, दि. १२ मार्च २०१८

प्रस्तावना :-

शासनाच्या महत्वाकांक्षी ५० कोटी वृक्ष लागवडीच्या प्रकल्पासाठी विद्यार्थी हरित सेनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या स्थितीबाबत विविध उपक्रमाद्वारे अद्ययावत माहिती देणे, संवर्धनाच्या प्रत्यक्ष कामात लोकांना सहभागी करणे इ. उपक्रम राबविण्यात येतात. हे उपक्रम प्रत्येक जिल्हयातील २५० शाळांमधून राबविण्यात येतात. त्यासाठी प्रति शाळा रु. २५००/- इतके अनुदान देण्यात येते. सदर अनुदानाकरिता रु. २२०.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ च्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे **मागणी क्र. सी-०७-२४०६, वनीकरण व वन्यजीवन (०१)(००३) शिक्षण व प्रशिक्षण (००)(०४) विद्यार्थी हरित सेना (२४०६ A१९४) या योजनेंतर्गत सन २०१७-१८ करिता रु.२२०.०० लक्ष निधी** अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे त्यापैकी योजनेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सप्टेंबर, २०१७ ते मार्च, २०१८अखेर या कालावधीकरीता अर्थसंकल्पित निधीच्या ७०% मर्यादेत रु.१५४.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे. आता वित्त विभागाने चालू असलेल्या संपूर्ण वित्तीय वर्षाकरिता मंजूर केलेल्या आठमाही सुधारित अंदाजानुसार या योजनेकरिता एकूण १७६.०० लक्ष निधी खर्च करण्यात मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उर्वरित निधी रु. २२.०० लक्ष वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या **“विद्याथी हरित सेना (२४०६ A१९४)”** हया योजनेकरिता राखून ठेवण्यात आलेला संपूर्ण रु.२२०.००लक्ष निधी जुलै, २०१७ मधील पावसाळी अधिवेशनात अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पित निधीपैकी माहे सप्टेंबर, २०१७ ते मार्च, २०१८ या सात महिन्यांकरीता योजनांतर्गत अर्थसंकल्पीत निधीच्या ७० टक्केच्या मर्यादेत म्हणजेच रु.१५४.०० लक्ष

निधी शासन निर्णय दि. १५.०९.२०१७ अन्वये वितरित करण्यात आला आहे. आता वित्त विभागाने चालू असलेल्या संपूर्ण वित्तीय वर्षाकरिता मंजूर केलेल्या आठमाही सुधारित अंदाजानुसार या योजनेकरिता एकूण १७६.०० लक्ष निधी खर्च करण्यात मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उर्वरित निधी रु. २२.०० लक्ष निधी वितरीत करण्यात याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. विवरणपत्र-१ प्रमाणे निधी वितरणाचा कॅश फ्लो सोबत जोडला आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप करण्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यवध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत व्हावे.

५. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. सी-०७

२४०६, वनीकरण व वन्यजीवन

(०१)(००३) शिक्षण व प्रशिक्षण

(००)(०४) विद्यार्थी हरित सेना (२४०६ A१९४)५०- इतर खर्च

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८ अन्वये तसेच महसूल व वन विभाग शासन ज्ञापन क्रमांक बीयुडी-२०१८/२४०६/ प्र.क्र.३१/ब-१, दि. १२ मार्च २०१८ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२०१२३२५६३११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.03.20 12:34:48 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),नागपूर.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

५. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)

६. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,

७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई४०० ०३२.

९. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबईकग

१०. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२

११. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१२. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१३. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१४. निवडनस्ती/फ-११.

विवरणपत्र -१

साववि-२०१७/प्र.क्र.१०६/फ-११ दि. २० मार्च, २०१८ चे सहपत्र
योजनेचे नाव:- " विद्यार्थी हरित सेना " मुख्यलेखाशीर्ष :- (२४०६ A१९४)

(रु. लाखात)

सविस्तर लेखाशीर्ष	अर्थ-संकल्पित तरतूद	आठमाही सुधारित अंदाजा नुसार वितरणा साठी उपलब्ध तरतूद	वितरित तरतूद	मार्च, २०१८	एकूण रकाना क्र. (४+५)
१	२	३	४	५	६
मागणी क्र. सी-०७ २४०६, वनीकरण व वन्यजीवन (०१) (००३) शिक्षण व प्रशिक्षण विद्यार्थी हरित सेना (००)(०४) (२४०६ A२०२)	२२०.००	१७६.००	१५४.००	२२.००	१७६.००

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.03.20 12:35:52 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महसूल व वन विभाग